# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(दुपार)**

**दिनांक ०२.०८.२०२६ रविवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०१.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १४ केसेसमध्ये १४ ईसमावर कारवाई करून एकुण २०,३९५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०८ केसेसमध्ये ०८ इसमांवर कारवाई करुन १०,६७५/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,८४९ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,४०,०५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक ०१.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०२.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०७ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०२.०८.२०२६ चे ००.१० वा. ते ०२.०० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे गुन्हेगारांचे शोधात हद्यीत पेट्रोलींग करीत असतांना, पोलीस ठाणे भांडेवाडी हद्यीत जुना पारडी नाका, सातपुते पानठेल्यासमोर एक इसम संशयीतरित्या पिशवी घेऊन दिसल्याने, त्याचेजवळ जात असता, तो पळू लागल्याने त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव मोहम्मद जावेद उर्फ दुर्गेश हिरालाल चौरसिया वय २३ वर्ष रा. नसीमल सोसायटी, गुलमोहर चौक, शास्त्रकारचे घरी किरायाने, कळमणा, नागपूर असे सांगितले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन, एनडीपीएस कायद्यातील तरतुदींचे तंतोतंत पालन करुन, पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यातील पिशवीमध्ये अंमली पदार्थ हिरव्या रंगाचा गांजा एकुण वजनी १ किलो १२५ ग्रॅम कि. २८,१२५/— रु. चा मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन गांजा व ०१ मोबाईल असा एकुण ३८,१२५/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने नमुद गांजा त्याचे साथीदार पाहिजे आरोपी नामे १) ललित श्रीवास्तव रा. चंद्रनगर, भांडेवाडी २) पप्पु श्रीवास्तव रा. ओमनगर कळमणा यांचा असुन तो विक्री करीत असल्याचे सांगितले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे भांडेवाडी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात

आली आहे. आरोपीस मुद्देमालासह भांडेवाडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षिरसागर, पोहवा ज्ञानेश्वर भोगे, गणेश जोगेकर, पोअं संतोष शेंद्रे, नितीन राठोड, धनराज मसराम, धनपत मंजरेटे, चापोअं राहुल पाटील व मपोहवा अनुप यादव यांनी केली.



**<u>३) धंतोली पोलीसांची कामगीरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

फिर्यादी नरेंद्र वेरहोमल शिवनानी वय ५४ वर्ष रा. प्लॉट क्र. १५३, जरीपटका मेन रोड, नागपूर यांचे पोलीस ठाणे धंतोली हद्दीत यशवंत स्टेडीयम, भगवती मंदीर जवळ फेअरडील इलेक्ट्रानिक नावाचे दुकान आहे. दिनांक २६.०७.२०२६ चे २१.०० वा. ते दिनांक २७.०७.२०२६ चे १०.४५ वा. चे दरम्यान, फिर्यादी हे आपले दुकानाचे शटरला कुलुप लावुन घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दुकानाची खिडकी तोडून, आंत प्रवेश करून, दुकानाचे गल्ल्यातील रोख ३,४४,०००/—रू. तसेच, ०४ नग एलईडी टिव्ही व ०१ मोबाईल असा एकुण किंमती ४,५८,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे धंतोली येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान धंतोली पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी विश्वजीत नेतराज भोसले वय २१ वर्षे रा. जळगाव आर्वी, पोस्ट तामणापुर घोसई, ता. ताम्हणगाव, जि. अमरावती यास ताब्यात घेऊन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन गुन्हयातील मुद्येमाल ०३ एलईडी टिव्ही, गुन्हा करतांना वापरलेले वाहन क्र. एमएच ३१ बीडी १९७४, तसेच चोरीचे पैशांतुन घेतलेली नवीन टिव्हीएस रायडर क्र. एमएच २७ टीसी १७१, व ०१ मोबाईल फोन असा एकुण २,२५,५००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहू, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री सिंगा रेड्डह ऋषिकेश रेड्डी, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. सुनिलसिंग पवार, सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्री साईनाथ रामोड, पोउपनि. शुभम बकाल, पोहवा. योगेश, अमोल, पोअं. शैलेश, भुवनेश्वर, प्रितम, विक्की व ऋषभ यांनी केली.

**<u>४) पोलीस ठाणे गिट्टीखदान :— पोलीसांचे वैध रखवालीतुन पळून जाणारा आरोपी ताब्यात.</u>**

दिनांक ३१.०७.२०२६ चे २३.०० वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. २ पथकाचे अधिकारी व अंमलदार हे आरोपींचे शोधार्थ पेट्रोलींग करीत असतां, त्यांना माहीती मिळाली की, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्यीत बालोद्यान, सिव्हील लाईन येथे एक इसम हातात शस्त्र घेवुन लोकांना अडवित आहे. अशा खात्रीशीर

माहीतीवरून तेथे गेले असता, तो ईसम पोलीसांना पाहुन पळु लागल्याने, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व त्याचे हातातील लोखंडी चाकु काढून घेतला. आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, त्यास गिट्टीखदान पोलीसोचे ताब्यात दिले होते.

पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असतांना आरोपीने संधीचा फायदा घेऊन त्याची अटक टाळण्याकरीता पोलीस ठाणे येथून पळून गेला होता.

आरोपीचे शोधार्थ नागपूर शहरातील सर्व पोलीस ठाणे व गुन्हेशाखा येथील पथके रवाना करण्यात आली होती. गुन्हेशाखा युनिट क्र. २ चे पथकाने गुप्त माहिती प्राप्त करुन, तसेच तांत्रिक तपास करुन आरोपीला १८ तासाचे आत ताब्यात घेऊन गिट्टीखदान पोलीसांचे ताब्यात दिले आहे. आरोपीस गुन्हयात अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे तहसील :— हद्दपार ईसमास अटक.</u>**

दिनांक ०२.०८.२०२६ चे ०१.३० वा. चे सुमारास, तहसील पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, डोबीनगर, जमाल मिस्त्रीचे घराजवळ झगडा भांडण सुरु आहे अशा माहितीवरुन तेथे गेले असता, भांडण करणारा एक इसम पोलीसांना पाहून पळतांना दिसल्याने, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव साहेल उर्फ चाकु उर्फ कुत्ताखाऊ वल्द मोईनुद्दीन अन्सारी वय २६ वर्षे रा. जाफर किराणा जवळ, डोबीनगर, तहसील, नागपूर असे सांगीतले. पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०३ यांचे हद्दपार आदेश क्र. ०८/२०२६ दिनांक १६.०२.२०२६ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०१ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. तसेच तो पोलीस ठाणे येथील विनयभंग व दुखापतीचे गुन्हयातील पाहिजे आरोपी असल्याचे समजले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोहवा संजय शाहू यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे तहसील येथे पोउपनि. संदीप भिताडे यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे कळमणा :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०१.०८.२०२६ चे २०.५५ वा. चे सुमारास, कळमणा पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, जयभोज हॉटेलमागे, कळमणा मार्केटचे बाहेर, एक इसम शस्त्रासह फिरत आहे. अशा सुचनेवरून तेथे गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहुन पळु

लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव अब्दुल खालिक उर्फ अकबर खान करीम खान वय ४४ वर्षे रा. गोकुळ डेअरीजवळ, भारतनगर, कळमणा नागपूर असे सांगीतले. त्यांची अंगझडती घेतली असता, त्याचे फुलपॅन्टचे आत कंबरेत, एक लोखंडी चाकु मिळाला. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकु किंमती २००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कळमणा येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे गिट्टीखदान :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ३१.०७.२०२६ चे २१.३० वा. ते दिनांक ०१.०८.२०२६ चे १५.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत प्लॉट नं. ३, गायकवाड ले आऊट, गायत्री कॉलनी, हजारीपहाड, नागपूर येथे राहणारे फिर्यादी धम्मशील नंदकिशोर शामकुंवर वय ४० वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह पुणे येथे नातेवाईकांकडे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख ६,५००/— रु व सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने किंमती ३,४८,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि. पठान ९९२३१४०७३४ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे एमआयडीसी :—</u>** फिर्यादीचे वडील नामे जितेंद्रसिंग धिरसिंग मौर्य वय ४७ वर्ष, रा. प्लॉट क्र. ५७, बेलेनगर, कळमणा, नागपुर हे प्लंबीग कामे करतात. मागील ०१ वर्षापासून पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, वाघदरा, हिंगणा रोड येथील पॅराडाईज हिल्स अपार्टमेंट येथे काम सुरू आहे. दिनांक ०१.०८.२०२६ चे २१.३० वा. चे सुमारास, काम करीत असतांना त्यांना अचानक ईलेक्ट्रीक करंट लागल्याने ते बेशुध्द झाले. त्यांना सोबत काम करणारे नातेवाईकांनी उपचाराकरीता शालिनीताई मेघे हॉस्पीटल येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी उमेश जितेंद्रसिंग मौर्य, वय १८ वर्ष यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पोउपनि नुलगोंडवार यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे हुडकेश्वर</u> :—** विजयदत्त अशोकराव मुजगेलवार वय ५८ वर्षे, रा. प्लॉट क्र. १३४, शुभम साई सोसायटी, पिपळा फाटा रोड, हुडकेश्वर नागपूर हे दिनांक २५.०७.२०२६ चे १४.३० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मध्यम, उंची—५ फुट ४ इंच, केस—काळे, अंगात— पांढरा शर्ट व काळा फुलपॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. सोबत दुचाकी क्र. एमएच ३१ डीए २२०१ घेऊन गेले आहेत.

**<u>२) पोलीस ठाणे नंदनवन</u>:—** पुनम अनिल मुसळे, वय २० वर्षे, रा. प्लॉट क्र. ५३३, रमणा मारोती नगर, चिटणीस नगर, नागपूर हया दिनांक २४.०७.२०२६ चे २०.३० वा. पासुन पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतील राहते घरून पॅनकार्ड बनविण्याकरीता जाते असे सांगून कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला

असता मिळून आल्या नाही. **<u>वर्णन</u>** रंग–सावळा, चेहरा–गोल, बांधा–मध्यम, केस–काळे लहान, अंगात– जिन्स व टॉप घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.



विजयदत्त



पुनम

**स्वा/–**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**